CMYK


दैनिक साप्ताहिक आपल्या सर्वांचे लोकप्रिय वृत्तपत्र

# अक्षर वार्ता

संपादक – संजय आ.हंगे
मो.९७६६२६८४१५

DAILY SAPTAHIK AKSHAR VARTA

कार्यकारी संपादक – सुमन डापकर
मो.८७८८२५१११४



नवीन जागेत स्थलांतर
डॉ. जाजू सरांचे
व्यंकटेश नेत्रालय

पत्ता: मंत्री बँकेच्या पाठीमागे व शिवकमल हॉस्पिटल च्या पुढे 'व्यंकटेश नेत्रालय' जालना रोड, बीड. मो- ९७६६४९०२४२ / ९९२२०३१५०३ / ९५०३६०५६८०

बीड (महाराष्ट्र) वर्ष ४ थे, अंक ३४२ वार सोमवार दिनांक २३ डिसेंबर २०२४ RNI Reg.NO./2021/83381 E-mail : aksharwartanews@gmail.com पृष्ठे : ४ किंमत २ रुपये

BEED (MAHARASHTRA) Year 4 Issue 342 MONDAY Dt 23 December 2024 RNI Reg. NO./2021/83381 daily Marathi E-mail : akasharwartanews@gmail.com Pages 4 Prise Rs.2

# खातेवाटपानंतर आता पालकमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरु?

**मुंबई (प्रतिनिधी):– महाराष्ट्र विधानसभेत महायुतीला बहुमत मिळाले. महायुतीचे सरकार स्थापन झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. तर अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.यानंतर १५ डिसेंबरला राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार करण्यात आला. मंत्रिमंडळ विस्तारानंतर लगेचच राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरु झाले. या हिवाळी अधिवेशनापूर्वी किंवा त्यादरम्यान खातेवाटप होईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र अखेर अधिवेशन संपल्यानंतर रात्री उशीरा खातेवाटप जाहीर करण्यात आले. आता खातेवाटपानंतर अनेक मंत्र्यांची पालकमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरु झाली आहे.**

महायुतीच्या खातेवाटपात देवेंद्र फडणवीसांनी स्वत:कडे गृह, ऊर्जा (अपारंपरिक ऊर्जा वगळून), विधी आणि न्याय, सामान्य प्रशासन, माहिती आणि जनसंपर्क विभाग आणि इतर मंत्र्यांना नेमून न दिलेली उर्वरित खाती ठेवली आहेत. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना नगरविकास आणि गृहनिर्माण या दोन महत्त्वाच्या खात्यांसह सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) हे महत्त्वाचे खाते देण्यात आले आहे. त्यासोबतच उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अर्थ आणि नियोजनसह राज्य उत्पादन शुल्क



खाते देण्यात आले आहे. महायुतीकडून खातेवाटप झाल्यानंतर आता अनेक मंत्र्यांनी आपपल्या जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदासाठी लॉबिंग सुरु केले आहे.

महायुतीत पालकमंत्रि पदावरुन जोरदार रस्सीखेच सध्या महायुतीत पालकमंत्रिपदावरुन जोरदार रस्सीखेच पाहायला मिळत आहे. रायगड जिल्ह्याच्या पालकमत्रिपदावर मंत्री भरत गोगावले यांनी दावा केला आहे. त्यासोबतच अदिती तटकरे या देखील रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी इच्छुक आहेत. तर बीडमध्ये धनंजय मुंडे की पंकजा मुंडे पालकमंत्री होणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. तसेच संभाजीनगरमध्ये संजय शिरसाट की अतुल सावे यापैकी कोणाच्या गळ्यात पालकमंत्रिपदाची माळ पडणार हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.

मुंबईच्या पालकमंत्रिपदावरुन शिवसेना आणि भाजपमध्ये स्पर्धा

तर दुसरीकडे मुंबईच्या पालकमंत्रिपदावरुन शिवसेना आणि भाजपमध्ये स्पर्धा पाहायला मिळत आहे. आगामी काळात मुंबई महापालिका निवडणुका होणार आहेत. त्यामुळे मुंबई शहरासह उपनगरातील पालकमंत्रिपद आपल्याला मिळावे, यासाठी शिवसेना आणि भाजप आग्रही आहेत. त्यामुळे मुंबईतील पालकमंत्रिपदी कोण विराजमान होतं हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.

## निराधारांना मिळणार संजय गांधी,श्रावणबाळ योजनेचा लाभ

### आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्याला यश

बीड (प्रतिनिधी):- बीड तालुक्यातील अनेक निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांच्या रखडलेल्या मंजुरी अखेर झाल्या असून नवीन लाभार्थ्यांची यादी तयार झाली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.



निराधार वयोवृद्ध नागरिक यांना निर्वाहासाठी निधी देणारी श्रावणबाळ योजना तसेच निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, दिर्घ आजार, घटस्फोटीत स्त्रिया इत्यादी दुर्बल घटकांना आर्थिक मदत पुरवणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि अशाप्रकारच्या इतर योजनांच्या समितीची गेल्या अनेक दिवसांपासून बैठक झाली नव्हती, त्यामुळे गोरगरीब आणि गरजू या योजनांच्या लाभापासून वंचित होते. बर्याच दिवसांपासून प्रस्ताव आणि अर्ज दाखल करून देखील लोकांना लाभासाठी प्रतिक्षा करावी लागत होती. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करून, बैठका घेऊन संबंधित यंत्रणा व योजना समितीच्या बैठका घेऊन नवीन पात्र लाभार्थी यादीत समाविष्ट करून पात्र आणि गरजूंना लाभ देण्यासाठी निर्देशीत केले होते. यावर आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील ग्रामीण भागातून असलेल्या १२९ व शहरातील ९७ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच संजय गांधी निराधार पेन्शन योजनेंतर्गत शहरातील पान २ वर...

## बीडची जबाबदारी स्वीकारताच एसपी नवनीत काँवत 'ॲक्शन मोड'वर

बीड (प्रतिनिधी):– जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर तपासात दिरंगाई केल्याप्रकरणी बीडच्या पोलीस अधीक्षकांची बदली केल्यानंतर त्यांच्या जागी नवनीत काँवत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. काँवत यांची शनिवारी पदभार स्वीकारल्यानंतर लगेचच आज रविवारी जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांची बैठक आयोजित केली. शासनाने माझ्यावर मोठी जबाबदारी सोपवली आहे. ही जबाबदारी नीट पार पडणं, कायद्याचे राज्य प्रस्थापित करणं हे माझं ध्येय आहे. त्यामुळे शनिवार-रविवार असला म्हणून काही फरक पडत नाही. मी आता पोलीस अधिकाऱ्यांची बैठक बोलावली आहे. या बैठकीत त्यांचं म्हणणं मी ऐकून घेणार, जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेणार आणि लोकांची जी अपेक्षा आहे की जिल्ह्यातील परिस्थितीत सुधारणा झाली पाहिजे, त्यासाठी मी १०० पान २ वर...



## स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

### आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आज सामूहिक बैठक

बीड (प्रतिनिधी):- केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्त्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.




मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित पान २ वर...

## सरपंच खून प्रकरणी विशेष वकील म्हणून ॲड. कोल्हे यांची नियुक्ती

बीड (प्रतिनिधी):- मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणी अवघ्या राज्यात खळबळ उडाली आहे. या प्रकरणात विशेष वकील म्हणून ॲड. बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कोल्हे हे बाजू मांडणार आहेत.



संतोष देशमुख यांची गेल्या काही दिवसांपूर्वी निघृणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणात काही आरोपींना अटक करण्यात आली तर काही आरोपी अद्यापही फरार आहेत. हे प्रकरण अवघ्या राज्यात चर्चेत आले आहे. संसदेसह विधीमंडळात या प्रकरणावर आवाज उठविण्यात आला. हत्या प्रकरणात विशेष वकिलाची नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार विशेष लोकअभियोजक म्हणून ॲड. बाळासाहेब दत्तात्रय कोल्हे यांची विशेष वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड. कोल्हे यांना फौजदारी प्रकरणात दांडगा अनुभव असल्यामुळे त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

## बसच्या धडकेने जिल्हा परिषद शिक्षकाचा मृत्यू

### गेवराई–शेवगाव रस्त्यावर घडली घटना

बीड (प्रतिनिधी):- भरधाव वेगात निघालेल्या एसटी बसने मोटारसायकलवर जात असताना शिक्षकास जोरात धडक दिली. या अपघातात शिक्षकाचा जागीच मृत्यू झाला. बसने शिक्षकास दोनशे फूट फरफटत नेले. ही दुर्दैवी घटना गेवराई-शेवगाव रस्त्यावरील महारटाकळी येथे काल सकाळी आठच्या सुमारास घडली.



फय्याज खान (वय ४५ वर्षे, रा. महारटाकळी ता. गेवराई) हे अर्धपिंप्री या ठिकाणी पान २ वर...

## राज्यस्तरीय वंजारी वधु वर परिचय मेळाव्याच्या पूर्व तयारीसाठी मातृभूमीची बैठक संपन्न


बीड( प्रतिनिधी): मातृभूमी प्रतिष्ठान बीडच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय मातृभूमी आदर्श शिक्षक पुरस्कार व स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी व राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार तसेच राज्यस्तरी सतराव्या वंजारी समाज वधु वर परिचय मेळाव्याच्या पूर्व तयारीसाठी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने डी. जी. तांदळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या दि. २२ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११ ते १ वाजेच्या दरम्यान मातृभूमी प्रतिष्ठानच्या कार्यालयात कृष्णाई नगर , आगलावे इस्टेट , अंकुश नगर ,बीड .येथे मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाली .बैठकीत विविध विषयावर पान २ वर...



### शरद पवारांचा फडणवीसांना फोन वरून

## संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणात प्रत्यक्ष लक्ष घालण्याची केली विनंती

पुणे (प्रतिनिधी):- राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी फोनवरून संपर्क साधून महत्वाच्या प्रकरणांबाबत चर्चा केली. या संवादात त्यांनी सरपंच संतोष देशमुख यांच्या बीड प्रकरणावर लक्ष घालण्याची केली विनंती, तसेच पुण्यातील भीमथडी जत्रा आणि साहित्य संमेलन या दोन महत्त्वाच्या कार्यक्रमात येण्याची केली विनंती. काल सकाळी पुण्यातील मोदी बागेत साहित्य संमेलनाच्या आयोजकांनी शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर शरद पवार यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी फोनवरून संवाद साधला. भीमथडी जत्रेला सुरुवात होऊन १८ वर्षे झाली आहेत. यंदा या जत्रेला अप्पासाहेब पवार यांना समर्पित करण्यात आले आहे. पवार म्हणाले, भीमथडी जत्रा ही आता देशपातळीवर पोहोचत आहे, याचा मला अभिमान आहे. जत्रेला चांगला प्रतिसाद मिळत आहे आणि यावेळी देखील मोठ्या प्रमाणावर लोक उपस्थित राहतील. दिल्लीमध्ये होणाऱ्या साहित्य संमेलनाबाबतही शरद पवारांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली. या कार्यक्रमासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी फडणवीस यांना केले. बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या प्रकरणाबाबतही शरद पवारांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना लक्ष देण्याची विनंती केली. त्यांनी सांगितले, मी परवा भेटून आलो त्या ठिकाणची स्थिती अत्यंत गंभीर आहे. त्या घटनेची सखोल चौकशी करून न्याय देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत असे शरद पवार म्हणाले.



CMYK

## संपादकीय...

# मुलीचं लग्न मान्य करा

पाश्चात्त्य देशांत मुलांचं शालेय पशिक्षण झालं की, महाविद्यालयीन शिक्षणासाठी मुलं घराबाहेर पडतात. शालेय जीवनापासून मुलांना आर्थिक स्वावलंबनाचे महत्त्व शिकवले जाते. आपण आपल्या आई-वडिलांपासून स्वतंत्र आहोत, आपली वेगळी ओळख आहे ही जाणीव मुलांना लहानपणापासूनच असते. त्यामुळे स्वतःचे निर्णय घेणे आणि त्या निर्णयाच्या परिणामांची जबाबदारी घेणे या दोन्ही गोष्टी मुलं निपणापासून आत्मसात करतात. भारतातही मुलं अठरा वर्षांची झाली की सज्ञान झाली, त्यांचे निर्णय घेण्यास सक्षम झाली असे कायदा सांगतो, पण भारतीय कुटुंबमानस मात्र तसे मानत नाही. आपल्याला एकत्र कुटुंबपद्धती, कौटुंबिक जीवनाची सवय असल्याने मुलं कितीही मोठी झाली तरी त्यांच्या पालकांची भूमिका निभावण्यात पालकांनाही काही गैर वाटत नाही. सज्ञान मुलांच्या संपूर्ण शिक्षणाचा, लग्नाचा आणि लग्नानंतरही त्यांची जबाबदारी घेणं यात भारतीय मनाला काही चुकीचे वाटत नाही. किंबहुना तसं केलं नाही तर आपण पालक म्हणून कमी पडलो, असेदेखील भारतीय पालकांना वाटते. मुलींच्या बाबतीत तर ही 'पालकत्वाची' जबाबदारीची भावना आणखीनच तीव्र असते. यात मुलींना दुर्बळ, अबला, स्वतः योग्य निर्णय घेण्यास असमर्थ समजणं आहेच, पण शिवाय मुलींवर 'कुलशील' जपण्याची जबाबदारी असणं ही भावनाही निगडित आहे. मुलगी कितीही हुशार असली, शिक्षित असली तरी तिचं परावलंबित्व भारतीय सांस्कृतिक मनात ठसलेलं आहे.

मुलींचं स्वातंत्र्य ही अजूनही समाजमनाला न पटणारी नव्हे तर न समजलेलीच बाब आहे. एकूणच कुटुंब आणि मुलांच्या संदर्भात बांधिलकी मानणारी भारतीय मानसिकता मुलींच्या बाबतीत जरा जास्त पुराणमतवादी दिसते. मुलींनी शिक्षण घेताना, नोकरी करताना शक्यतो संसार सांभाळून नोकरी करता येईल, अशी निवड करण्याची अपेक्षा असते. संसार सांभाळण्याला प्राधान्य देऊन जमेल तशी आणि जमेल तेवढीच करिअर करावी, अशी आजही अपेक्षा असते. मुलींच्या लग्नाच्या बाबतीत देखील मुलींनी कोणाशी लग्न करावं याबद्दल पालक अतिशय आग्रही असतात. बऱ्याच घरांमधून आजही मुलींच्या लग्नाचा विषय संपूर्ण घराण्याचा मानबिंदू मानला जातो. आपल्या अपेक्षांच्या आग्रहाचे ओझे मुलींच्या डोक्यावर ठेवताना आपण त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार नाकारत आहोत, तिचा निर्णय स्वातंत्र्य हिरावून घेत आहोत, हे पालकांना पटतच नाही. आपण सांगतोय तेच बरोबर आणि मुलींनी आपलं म्हणणं ऐकलंच पाहिजे याचा दुराग्रह मुलींनी आपल्या निवडीच्या व्यक्तीशी लग्न केलं तर तिच्याशी संबंध तोडण्यापासून ते तिचा जीव घेण्यापर्यंतही पालक जातात.

मुळात आपल्या मुलीला स्वतःची बुद्धी आहे, तिला सारासार विचारशक्ती आहे, ती योग्य निर्णय घेईल यावर विश्वास ठेवायलाच पालक तयार नसतात. पालक म्हणून आपण घेतलेला निर्णय देखील चुकू शकतो तसा एखाद्या वेळेस मुलीचा निर्णय चुकला तरी तो निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आपण तिला द्यायला हवे हे पालक लक्षात घेत नाहीत. कधी अतिप्रेमापोटी तर कधी अतिसंरक्षक वृत्तीने मुलींच्या स्वतःच्या मर्जीने नवरा निवडण्याला विरोध होतो. त्यातही आंतरजातीय किंवा आंतरधर्मीय विवाह असेल तर तो स्वीकारणे आणखी कठीण असते. अशा प्रसंगी इतका टोकाचा विरोध होतो की शेवटी न्यायालयाच्या हस्तक्षेपाची आणि संरक्षणाची आवश्यकता भासते.

भारतीय कायद्यानुसार मूल अठरा वर्षांचं झालं की त्याला स्वयंनिर्णयाचा अधिकार प्राप्त होतो. त्याबरोबरच त्या निर्णयाच्या बऱ्यावाईट परिणामांची जबाबदारी घेणे अध्याहृत आहे. सज्ञान व्यक्तीला एखादी गोष्ट करण्या - न करण्यातील फायदे-तोटे लक्षात आणून दिल्यावर ती गोष्ट करावी की नाही हा संपूर्णपणे त्या व्यक्तीचा निर्णय असायला हवा, तर त्याला स्वयंनिर्णय म्हणता येईल. एखादी गोष्ट करण्यातील धोके पत्करायचे की नाही हा स्वयंनिर्णयाचा अधिकार राबवला की त्यांच्या परिणामांची जबाबदारी टाळता येत नाही. कायदाही स्वयंनिर्णयाच्या अधिकार स्वातंत्र्यासोबत त्या निर्णयाच्या परिणामांची जबाबदारीही आपल्यावरच सोपवत असतो. उदाहरणार्थ, सिगारेटच्या पाकिटावर सिगारेट पिणे आरोग्यास हानिकारक असल्याचा वैधानिक इशारा असतो. पण तो इशारा मानावा की नाही, सिगारेट प्यावी की नाही याचा निर्णय कायदा सज्ञान व्यक्तीवर सोडतो. थोडक्यात कायदा आपल्याला परिणामांची जाणीव करून देतो आणि स्वयंनिर्णयाचा अधिकार देऊन परिणामांची जबाबदारीही आपल्यावर सोपवतो.

मुलींच्या/महिलांच्या सक्षमीकरणाबद्दल आपण बोलतो तेव्हा सक्षमीकरणाची सुरुवात आपल्या घरात/कुटुंबातच बालपणापासून होत असते, हे आपण लक्षात घ्यायला हवे. पालकांनी लहानपणापासून मुलींना सारासार विचार करून, योग्य-अयोग्य परिणामांचा विचार करून स्वयंनिर्णय घेण्यास शिकवायला हवे, तसे स्वातंत्र्य द्यायला हवे आणि तसे करण्यास सातत्याने उत्तेजन दिले पाहिजे. त्याचबरोबर आपल्या निर्णयांच्या बऱ्यावाईट परिणामांची जबाबदारी घ्यायलादेखील शिकवायला हवे. आपला प्रत्येक निर्णय बरोबरच ठरेल, असे नाही. मग अशा वेळी अपयशाचा सामना कसा करावा, मनाला वाटणारं दुःख कसं हाताळावं आणि त्यातून बाहेर कसं पडता येईल याची फार लहानशा स्तरावर सुरुवात करून देता येईल.

उदाहरणार्थ मुलीने हॉटेलमध्ये एखादा पदार्थ मागवला आणि तिला तो आवडला नाही तरी तो संपवायला हवा इतकी छोटीशी गोष्टदेखील मुलींना स्वयंनिर्णयाचा अधिकार देणे तसेच त्या निर्णयाच्या परिणामांची जबाबदारी घ्यायलाही शिकवू शकते. आपला एखादा निर्णय चुकीचा ठरण्याचा धोका किंवा रिस्क असेल तर त्यासाठी काही 'प्लॅन बी' असावा का हेही मुलींना शिकवायला हवे. केवळ नोकरी करण्यानं, अर्थार्जनानं, शारीरिक क्षमता वाढविल्यानं महिला सक्षमीकरण होणार नाही तर मुलींना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणं, त्यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देणं आणि त्या निर्णयाच्या परिणामांची जबाबदारी घ्यायला शिकवणं यातून मुलींचा आत्मविश्वास वाढेल आणि पर्यायाने महिला सक्षमीकरण होईल. 'न स्त्री स्वातंत्र्यम् अर्हति'चे दिवस खऱ्या अर्थाने मागे पडायला हवे असतील तर मुलींचा स्वयंनिर्णयाचा अधिकार आणि स्वातंत्र्य मान्य करणे गरजेचे आहे.

# पोट व्यवस्थित साफ होत नसेल तर दुधात टाकून प्या 'ही' एक गोष्ट, कॉन्स्टिपेशनचा त्रास कमी

आजच्या धावपळीच्या आणि चुकीच्या लाइफस्टाईलमुळे अनेकांना बद्धकोष्ठतेची समस्या होते. पाणी कमी पिणे, चुकीचे पदार्थ खाणे, शारीरिक हालचाल न करणे यामुळे पचन तंत्र बिघडतं. ज्यामुळे पोट व्यवस्थित साफ होत नाही. जर तुम्हालाही अनेकदा बद्धकोष्ठतेची समस्या होत असेल तर आरोग्यासंबंधी वेगवेगळ्या समस्या होऊ शकतात. बद्धकोष्ठतेमुळे पोटात गडबड, सूज आणि हलकी वेदना होते. लाइफस्टाईलमध्ये काही बदल करून ही समस्या दूर केली जाऊ शकते. यासाठी एक प्रभावी घरगुती आहे. तो म्हणजे दुधात मध टाकून पिणे. या उपायाने पोट लगेच साफ होईल. चला जाणून घेऊ याचे फायदे आणि पिण्याची पद्धत...




ेटाला मिळेल आराम दुधात कॅल्शिअम आणि प्रोटीन भरपूर असतं. जे पचन तंत्राला व्यवस्थित काम करण्यासाठी मदत करतं. दुधाने पोटाच्या मांसपेशींना आराम मिळतो आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होते. बद्धकोष्ठतेची समस्या असल्यावर रात्री झोपण्याआधी एक ग्लास दूध प्यावं. मधाचे फायदे बद्धकोष्ठता असल्यावर मधाचं सेवन केल्यास पचन तंत्र मजबूत राहतं. मधात अँटी-बॅक्टेरिअल आणि अँटी-इन्फ्लेमेटरी गुण असतात, जे आतड्या साफ ठेवतात. दुधाने आतड्यांमधील विषारी तत्व बाहेर पडण्यास मदत मिळते. ज्यामुळे बद्धकोष्ठता दूर होऊन पोट साफ होतं. लॅक्टिक ॲसिड लॅक्टिक ॲसिड बद्धकोष्ठतेपासून आराम देण्यास मदत करतं. कारण याने आतड्यांची गति वाढते. याने नॅचरल पद्धतीने पचन तंत्र उत्तेजित होतं. ज्यामुळे मलत्याग करण्यास सहजता येते. लॅक्टिक ॲसिडने आतड्यांमधील विषारी तत्व बाहेर पडतात. ज्यामुळे बद्धकोष्ठताही दूर होते. दूध पिण्याची पद्धत रोज रात्री झोपण्याआधी एक ग्लास गरम दुधात एक चमचा मध टाकून प्यावे. हे प्यायल्याने आतड्यांचं आरोग्य चांगलं राहतं आणि मलत्याग करण्यास मदत मिळते. सकाळी पोट साफ होण्याची शक्यता जास्त असते. हा उपाय काही दिवस नियमितपणे केल्यास पचन तंत्र सुधारतं आणि बद्धकोष्ठतेची समस्या हळूहळू कमी होईल.

# राज ठाकरे-उद्धव ठाकरे भेटीवर एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची पहिली प्रतिक्रिया, ते दोघं एकत्र..

मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोघंही आज एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येतील का? या चर्चा कायमच सुरु असतात. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडून नवा पक्ष स्थापन केल्यापासून या चर्चांना सुरुवात झाली आहे. दरम्यान २०१९ मध्ये जेव्हा विधानसभा निवडणूक आली होती तेव्हा राज ठाकरे हे महाविकास आघाडीबरोबर होते. मात्र २०२२ नंतर राज ठाकरे महायुतीबरोबर गेले. आता आज एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ठाकरे बंधू एकत्र आल्याचं पाहण्यास मिळालं. याबाबत आता एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने प्रतिक्रिया दिली आहे. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे कुठे भेटले? राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे हे दोन्ही नेते एका लग्नाच्या निमित्ताने एकत्र आलेले दिसले. या दोघांमध्ये चर्चाही झाली. ती काय होती त्याचा तपशील समजू शकलेला नाही. मात्र आता हे दोन नेते एकत्र आल्याने महापालिका निवडणुकीच्या आधी काही सूत्रं बदलतील का



या चर्चांना मुंबईतल्या राजकीय वर्तुळात हे दोन बंधू आणि राजकीय नेते एकत्र येतील अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. मुंबईतल्या दादर या ठिकाणी असलेल्या राजे शिवाजी महाविद्यालयात लग्नाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यासाठी हे दोन्ही नेते सहकुटुंब पोहचल्याचं पाहण्यास मिळालं. राजकीयदृष्ट्या एकमेकांमध्ये शत्रुत्व सुरु असलेले हे दोन नेते एकत्र आल्याने साहजिकच राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाल्या. दरम्यान एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे नेते संजय शिरसाट यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे.

# बालरंगभूमीला उभारी देणं ही आपलीच जबाबदारी आहे, विसरू नका!

- लहान मुलांची भूमिका असलेलं नाटक म्हणजे बालनाट्य या समजुतीला छेद देण्याचं काम सुधा करमरकर आणि रत्नाकरने केलं. सुधा एका शिष्यवृत्तीच्या निमित्त अमेरिकेला गेली होती. तिथे तिने ज्या प्रकारची बालनाट्यं पाहिली तशी भव्यदिव्य नाटकं मराठी रंगभूमीवर यायला हवीत, असं तिला वाटलं. तिच्यासाठी रत्नाकरने लिहिलेल्या अस्सल भारतीय बाजाच्या 'मधुमंजिरी' नाटकाने बालनाट्य रंगभूमीला ऊर्जा दिली. सुधा करमरकरने सुरू केलेल्या 'लिटल थिएटर'तर्फे मी आणि रत्नाकरने 'कळलाव्या...' हे नाटक केलं. त्यानंतर मात्र मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारं नेपथ्य असणारी, त्यांच्या भावविश्वाचे विषय असणारी नाटक करावीत असं आम्ही ठरवलं. 'बालनाट्य' या स्वत:च्या संस्थेतर्फे 'राजकन्येची सावली हरवली', 'भामटे आणि कावळे' आणि 'एक होता मुलगा' या तीन नाटिका बसवल्या. पहिल्या प्रयोगाला पु. ल. देशपांडे प्रमुख पाहुणे म्हणून आले होते. हे प्रयोग मुलांपर्यंत पोहोचावेत यासाठी मी शाळेच्या मुख्याध्यापकांना भेटून या नाटिकांचे प्रयोग करण्याची परवानगी मिळवली.



चिकित्सक, बालमोहन या शाळा आमचे नाट्यप्रयोग करण्यासाठी तयार झाल्या. मुंबईपाठोपाठ आम्ही पुणे, सांगली या शहरात बालनाट्यांचे प्रयोग केले. सुटसुटीत नेपथ्य आणि हॉलच्या भाड्याचा वाचलेला खर्च यामुळे आम्ही केवळ आठ आण्यांत मुलांना नाटकं दाखवू शकलो. त्या दरम्यान आम्ही 'निम्माशिम्मा राक्षस' रंगभूमीवर आणलं. 'गाणारी मैना', 'अचाट गावची अफाट मावशी', 'अदृश्य माणूस', 'अलबत्या गलबत्या' ही आम्ही केलेली नाटकं प्रौढांच्याही पसंतीला उतरली. एनएसडीमधल्या नाट्य प्रशिक्षणाचा तुमच्या कामात कसा फायदा झाला? नाट्यनिर्मितीच्या बहुतेक सर्व बाजू मी आणि रत्नाकरच सांभाळत असू. त्याला प्रशिक्षणाची जोड असावी असं वाटलं. रत्नाकरची बँकेत नोकरी होती, त्यामुळे मग मी एनएसडीमध्ये जाऊन प्रशिक्षण घ्यायचं असं ठरवलं. एनएसडीमध्ये मला नाटक या माध्यमाचा सर्वांगीण अभ्यास करता आला. दिल्लीहून परतल्यावर मी 'धडपडे-बडबडे आणि मारकुटे मंडळी' या बालनाट्याचं दिग्दर्शन केलं. वेळ पडेल तेव्हा या नाटकात धडपडे बाईंची भूमिकाही केली. 'झुकझुकभाऊ इंजिनवाले' हे नाटक लिहिलं. राजस्थान, गुजरात, हिमाचल प्रदेश तसेच दुबई, मस्कत आणि अमेरिकेतही जाऊन नाट्य प्रशिक्षणवर्ग घेतले. 'कास्प प्लॅन' या संस्थेत काम करत असताना मला वस्तीत राहणाऱ्या मुलांच्या समस्यांची जाणीव झाली. या मुलांना आपलंसं वाटेल असं नाटकाचं कथानक असणं गरजेचं होतं. रत्नाकरने त्यासाठी 'बूटबैंगण' हे नाटक लिहून दिलं. उच्चभ्रू आणि मध्यमवर्गीय मुलांपेक्षा झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांच्या वाट्याला येणार आयुष्य वेगळं असतं. त्यांच्यातील कलागुणांना वाव मिळावा यासाठी एक चळवळ उभी करण्याचं आम्ही ठरवलं. संजय मंगला गोपाळ, हर्षदा बोरकर ही मंडळी आमच्या सोबतीस आली. आज ठाण्यात 'वंचितांचा रंगमंच' ही चळवळ जोमाने उभी राहिली आहे.

पान १ वरून..

### स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

------------------------

### बीडची जबाबदारी स्वीकारताच एसपी

टक्के प्रयत्न करणार, असं म्हणत काँवत यांनी बीडला गुन्हेगारीमुक्त जिल्हा करणार असल्याचं म्हटलं आहे.

बीडचा बिहार झाल्याचा आरोप होत आहे. याबाबत प्रश्न विचारताच नवनीत कावत म्हणाले की, वैयक्तिकरीत्या मी या गोष्टीशी सहमत नाही. कारण मी मानतो की, हे दोन्ही भारताचेच भाग आहेत. माझं लक्ष्य आहे की, जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्थेची परिस्थिती सुधारली पाहिजे. लोकांचा पोलिसांवरील विश्वास वाढेल, यादृष्टीने काम केलं जाईल , असं काँवत म्हणाले.

दरम्यान, मी जिल्ह्यातील परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर नक्कीच मस्साजोग इथं जाऊन दिवंगत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेईन आणि त्यांच्या हत्या प्रकरणातील फरार असलेल्या तीन आरोपींचा लवकरात लवकर शोध घेऊन त्यांना अटक केली जाईल, असं नवनीत काँवत यांनी सांगितलं आहे.

कोण आहेत नवनीत काँवत?

नवनीत काँवत हे २०१७ च्या आयपीएस बॅचचे आहेत. अधीक्षक म्हणून त्यांची ही पहिलीच पोस्टिंग आहे. कायदा व सुव्यवस्थेसह जिल्हा शांत ठेवण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. काँवत यांना सायबर क्राईममध्येही काम करण्याची आवड आहे. त्यामुळे सायबर ठाण्यातील प्रलंबित गुन्हे आणि तक्रारींचा निपटारा होण्यासह मदत होणार आहे. त्यांना खेळ खेळणे, गाणे, नृत्य करणे याचाही छंद आहे. मुळचे अलवरचे (राजस्थान) रहिवासी आहेत. त्यांचे शालेय शिक्षण सैनिक स्कूल चित्तोडगड, राजस्थान येथे झाले. इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी, आयआयटीमध्येही पदवी घेतलेली आहे सम टोटल सिस्टम्स, हैदराबाद २०१२-२०१३ मध्ये सॉफ्टवेअर अभियंता, भारतीय रेल्वे २०१५- २०१६ मध्ये आयईएस अधिकारी, आयकर विभागात २०१६-२०१७ मध्ये आयआरएस अधिकारी म्हणून नोकरीचा अनुभव आहे. २०१७ साली ते आयपीएस झाले. लोणावळा येथे उपविभागीय पोलिस अधिकारी, धाराशिवला अपर पोलिस अधीक्षक आणि आता छत्रपती संभाजीनगर येथे उपायुक्त म्हणून कर्तव्य बजावत होते. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत त्यांचे काम समाधानकारक होते. त्यांनी क्यूआर कोडवर आधारित नागरिकांचा अभिप्राय आणि तक्रार नोंदवण्याची यंत्रणा सुरू केली आहे. तसेच डीसीपी कार्यालयात स्वतः तक्रारदाराशी २४ तासांत संपर्क करत होते.

बीडमधील आव्हान

मस्साजोग सरपंच हत्या प्रकरणासह इतर अनेक घटना, घडामोडी जिल्ह्यात घडल्या. त्यामुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. हेच सर्व मुद्दे आ. संदीप क्षीरसागर, सुरेश धस, नमिता मुंदडा, विजयसिंह पंडित यांच्यासह इतर आमदारांनी उपस्थित केले होते. याच अनुषंगाने शुक्रवारी मुख्यमंत्री फडणवीस यांनी पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांची बदली करत असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर शनिवारी दुपारी लगेच नवनीत काँवत यांची नियुक्ती करण्यात आली. काँवत हे छत्रपती संभाजीनगर शहरात झोन २ ला उपायुक्त म्हणून कार्यरत होते. तेथेही त्यांनी अनेक धडाकेबाज कारवाया केलेल्या आहेत. आता अधीक्षक म्हणून त्यांची पहिलीच पोस्टिंग आहे. त्यामुळे जिल्ह्याला त्यांच्याकडून चांगल्या कामाच्या अपेक्षा आहेत. तसेच थेट आयपीएस आणि तरुण अधिकारी मिळाल्याने जिल्ह्यातील अवैध धंदे गंदाराज ताल माफियांची दादागिरी संपुष्टात येईल, अशी आशा आहे.

------------------------

### निराधारांना मिळणार संजय गांधी,

७६ व ग्रामीण भागातील ११२ पात्र आणि गरजू लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली सदरील योजनांची बैठक होऊन नवीन लाभार्थींचा योजनेच्या यादीत सामावेश केला गेला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून वंचित असलेल्या गोरगरीब, निराधार, दुर्बल घटकांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान ज्या लाभार्थ्यांचे अर्ज त्रुटीत पडले आहेत, त्यांनी लवकरात लवकर त्रुटीपूर्तता करावी असे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.

------------------------

### बसच्या धडकेने जिल्हा परिषद शिक्षकाचा मृत्यू

जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत होते. ते आपल्या गावालगत असलेल्या क्रिकेट मैदानावर रोज सकाळी क्रिकेट खेळण्यासाठी जायचे. सकाळी क्रिकेट खेळून फय्याज खान घराकडे जात असताना माजलगाव-पुणे या बसने (एम.एच. १३ सी.यू. ७८३६) त्यांच्या दुचाकीस जोराची धडक दिली. हा अपघात एवढा भीषण होता की, अपघातानंतर बसने दुचाकीसह फय्याज खान यांना जवळपास दोनशेफूट फरफटत नेले. या अपघातात फय्याज खान यांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची माहिती मिळाल्यानंतर चकलांबा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह शवविच्छेदनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला होता.

------------------------

### राज्यस्तरीय वंजारी वधु वर परिचय

चर्चा करून डी .जी. तांदळे यांनी नियोजित राज्यस्तरीय वंजारी वधू वर परिचय मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी मोलाची मार्गदर्शन केले .यावेळी डॉ. संजय तांदळे , पांडुरंग जायभाये कार्यकारी संपादक सौ.सुमन डापकर संपादक संजय हंगे, संतोष गरजे, उत्तम मिसाळ ,मोहनराव शिरसाठ ,.श्रीकांत गदळे , लक्ष्मण चाटे, राजकुमार हंगे, गणेश सानप आदींची उपस्थिती होती.

------------------------

# आरोग्य विम्याबाबत निर्णय नाहीच ;नव्या इलेक्ट्रिक वाहनांवर पाच टक्के कर; उपकरामध्ये कपात

नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखालील आज झालेल्या वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) परिषदेच्या ५५ व्या बैठकीत पेमेंट ॲग्रीगेटरना अप्रत्यक्ष करात सूट, नवीन इलेक्ट्रिक वाहनांवर (ईव्ही)१८ टक्क्यांऐवजी पाच टक्के कर, व्यापारी निर्यातदारांना पुरवठ्यावरील भरपाई उपकरात कपात यासह अनेक निर्णय घेण्यात आले असले, तरी आरोग्य विम्यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यावर कोणताही निर्णय घेण्यात आला नाही.

या बैठकीनंतर सीतारामन यांनी पत्रकारपरिषदेत विविध निर्णयांची माहिती दिली. आरोग्य विम्याच्या प्रीमियमवरील कर कमी करण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे. विमा नियामक प्राधिकरणाकडून (आयआरडीए) आणखी काही शिफारशी, माहिती येणे बाकी असून, मंत्रिगटाला आणखी काही कालावधीची गरज असल्याने हा निर्णय पुढे ढकलण्यात आल्याचे सीतारामन यांनी सांगितले.

विमानाचे इंधन (एटीएफ) वस्तू आणि सेवा कराच्या कक्षेत आणण्यावर राज्यांची सहमती नसल्याने याबाबतही निर्णय झालेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. स्विगी, झोमॅटोसारख्या फूड डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवरील कर सध्याच्या १८ टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. त्यावर व्यापक चर्चा झाली, परंतु कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. तो पुढे ढकलण्यात आला आहे, असेही सीतारामन यांनी नमूद केले. या बैठकीत, बँका किंवा वित्तीय संस्थांद्वारे कर्जदारांवर आकारल्या जाणाऱ्या दंडात्मक शुल्कावर कोणताही जीएसटी भरावा लागणार नाही. जीन थेरपीला आता जीएसटीमधून सूट देण्यात आली आहे; तसेच फोर्टिफाइड राईस कर्नलवरील दर पाच टक्क्यांनी कमी करण्यात आला आहे. नव्या



'ईव्ही'वर फक्त पाच टक्के जीएसटी

इलेक्ट्रिक वाहनांना (ईव्ही) प्रोत्साहन देण्यासाठी नव्या 'ईव्ही'वर फक्त पाच टक्के जीएसटी आकारला जाईल. जेव्हा एखादी कंपनी वापरलेली 'ईव्ही' खरेदी करेल किंवा एखादा विक्रेता पुनर्विक्रीसाठी वापरलेली 'ईव्ही' खरेदी करेल, तेव्हा १८ टक्के कर आकारला जाईल. दोन व्यक्तींमधील व्यवहारावर १८ टक्के जीएसटी लागू होणार नाही. मात्र, वापरलेल्या कारची खरेदी किंमत आणि विक्री किंमत यांच्यातील मार्जिन मूल्यावरदेखील १८ टक्के जीएसटी लागू होईल, असेही अर्थमंत्र्यांनी सांगितले. प्रमुख निर्णय बँका किंवा वित्तीय संस्थांकडून कर्जदारांवर आकारण्यात येणाऱ्या दंडात्मक शुल्कांवर कोणताही जीएसटी नाही प्री-पॅकेज केलेल्या आणि लेबलिंग केलेल्या वस्तूंच्या व्याख्येत सुधारणा करण्याची शिफारस ५० टक्क्यांपेक्षा जास्त फ्लाय श असलेल्या एसीसी ब्लॉक्सवर १२ टक्के जीएसटी जेव्हा एखाद्या शेतकऱ्याकडून काळी मिरी, ताजी हिरवी काळी मिरी किंवा सुकी काळी मिरी आणि काळ्या मनुकांचा पुरवठा केला असेल तेव्हा त्यावर जीएसटीला लागणार नाही. जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या दीर्घपल्ल्याच्या क्षेपणास्त्रांना (लाँग रेंज सरफेस टू एअर मिसाईल) 'जीएसटी'मधून सूट व्यापारी निर्यातदारांना पुरवठ्यावर भरपाई सेस दरात ०.१ टक्क्यांपर्यंत कपात

# वरपगाव येथे विठ्ठल रुक्मीणी मुर्ती व कलशारोहन



लोखंडीसावरगाव (प्रतिनिधी):- अबांजोगाई तालुक्यातील वरपगाव येथे विठ्ठल रुक्मीणीचे भव्य आसे मंदिराचे बाधकांम करण्यात आले ,ते वरपगाव येथील लेकी ज्या सुन म्हणून सासरी गेल्या होत्या त्यांची नावे शोधुन तालूका जिल्हा राज्यात किंवा राज्या बाहेर गेल्या आसतील त्यांचा हा मान आसतो तो मदिंर कळस हे तुम्हंच्याच मदतीने करावे याची माहीती मिळताच आपआपल्या नाते वाईकाच्यां हस्ते मदतीचा ओघ कमीत कमी पाचसे तर जास्तीत जास्त आकरा हजाराच्या स्वरुपात रक्कम झाली व पहाता पहाता मदिंराची वास्तू उभी झाली रंगरगोटी आतील गाभार्यातील नक्षी काम याचे ,देखावे तयार करण्यात आले ,या मध्ये विठ्ठल रुक्मीणीची मूर्ती फ्प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा दि,२६ डिंसेबर गुरुवार या महादेव तात्या चाकारवाडी यांच्या हस्ते तर तर अर्जुन महाराज लाड होळ वश्रीकिसन महाराज पवार मुकुंदराज संस्थान अबांजोगाई तर लालासाहेब नाना पवार यांच्या प्रमूख उपस्थीतीत होणार आसुन प्रसंगी दुपारी दोन ते चार या वेळेत अर्जून महाराज लाड यांचे किर्तन होणार आसल्याची माहीती.

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयाची शैक्षणिक सहल उत्साहात संपन्न

बीड (प्रतिनिधी):- श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित राजर्षी शाहू कन्या माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट नियोजन करून दिनांक १४/१२/२०२४ ते दिनांक १८/१२/२०२४ या कालावधीत विद्यालयाची शैक्षणिक सहल संपन्न झाली.

या सहलीसाठी ८० विद्यार्थिनींना घेऊन बीड-नगर-पुणे-पनवेल- मुंबई -गेट वे ऑफ इंडिया- राणीचा बाग- नेहरू तारांगण- मरीन ड्राईव्ह- हाजी अली दर्गा- वानखेडे स्टेडियम- मलबार हिल- विधान भवन -मंत्रालय- महालक्ष्मी मंदिर- अलिबाग- काशीद बीच- जंजिरा- महाड -रायगड- पोलादपूर- प्रतापगड -महाबळेश्वर -वाई- प्रतिबालाजी- जेजुरी-



मोरगाव गणपती- जामखेड -बीड यासारख्या ऐतिहासिक,भौगोलिक ,सागरी, सांस्कृतिक ,पर्यावरणीय व धार्मिक स्थळांना भेटी देऊन विद्यार्थिनींना त्या विषयाचे महत्त्व सांगण्यात आले.

या विद्यालयाच्या ८० विद्यार्थिनींनी एसटी महामंडळाच्या लाल परीने गुलाबी थंडीत सुरक्षित प्रवास करीत निसर्गरम्य ऐतिहासिक, पर्यटन व धार्मिक स्थळांना भेटी देऊन सहलीचा मनमुराद आनंद लुटला आहे.

यामध्ये विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम एस.डी यांच्या मार्गदर्शनाखाली सहल प्रमुख श्री.जगताप एस .सी, झोडगे जी .एस व मुंडे एल . आर,सोंडगे के. बी , मातकर व्हि.डि,आगलावे एम. एच,श्रीम. नन्नवरे मॅडम यांनी सहकार्य केले. या सहलीच्या यशस्वीतेबद्दल संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभीमराव जाहेर पाटील ,संस्थेचे सचिव प्रा.जे .पी शेळके यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक मंडळ तसेच प्राथमिक विभागाचे प्र.मुख्याध्यापक राऊत आर. टी, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम.लोखंडे आर.डी यांनी अभिनंदन केले.

# ज्ञानदीप विद्यालयातील पालक मेळाव्यास पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद स्पर्धा परीक्षा उपक्रमाचे कौतूक





किल्लेधारूर (प्रतिनिधी): धारूर येथील ज्ञानदीप विद्यालय व बालसस्कार केद्रातील पालकाचा पालक मेळावा व विवीध स्पर्धा परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्याचा गुणगौरव विवीध स्पर्धा चे बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. या शाळेतील विवीध उपक्रम विशेषताह बाल वया पासुन स्पर्धा परीक्षाचे दिले जाणारे मार्गदर्शन यांचे पालकानी विशेष कौतूक केले व काही सुचना पालकानी माडल्या. या पालक मेळाव्यास उस्फुर्त प्रतीसाद मिळाला. किल्ले धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय व बालसंस्कार केंद्र किल्ले धारुर या ठिकाणी पालक मेळाव्याचे आयोजन आज करण्यात आले होते. या पालक मेळाव्यास मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात क्रातीज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती माता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली. त्यानंतर विद्यालयातील विविध शालेय स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा व विद्यालयात विद्यार्थी व पालकांसाठी राबवण्यात आलेल्या विविध उपक्रम व स्पर्धेतील बक्षिस वितरण करून गौरव करण्यात आला त्यानंतर विद्यालयातील पालकांनी आपले विद्यालयाविषयी मनोगत व्यक्त केले तर उपस्थित मान्यवरांनी पालक व शिक्षक यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयातील पालक अशोक राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून चंद्रकांत देशपांडे , सय्यद शाकेर, दिनेश कापसे, नवनाथ नखाते, तानाजी शिंपले, शैला महाजन, उज्वला शिनगारे, ढाने मॅडम हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिक्षक अशोक अंडील , प्रस्ताविक शिक्षक सचिन चव्हाण तर आभार शिक्षीका वर्षा साळवे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले मातापालक व पालक मोठया संख्येने या पालक मेळाव्यास उपस्थीत होते



मा. ना .धनंजयजी मुंडे साहेब यांची महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री पदी नियुक्ती झाल्याबद्दल आज नागपुर येथे भेट घेऊन सत्कार करुन शुभेच्छा देताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष मा. बबनराव गवते बाप्पु समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर अध्यक्ष मा. बाळासाहेब गुजर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे व्ही. जे. एन. टी. सेलचे जिल्हा उपाध्यक्ष मा. केशव तांदळे आदी उपस्थित होते.



तलवाडा: राष्ट्रवादी काँग्रेसचे पार्टीचे सरचिटणीस मा. आ.अमरसिंह पंडित, तलवाडा येथे आले असता जयभवानी साखर कारखान्याचे संचालक तथा माजी मुख्याध्यापक गणपत नाटकर यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी भद्री नाटकर, राजाभाऊ डावकर, सुरेश नाटकर, बळीराम नाटकर, सचिन नाटकर, आदित्य नाटकर, रवी मरकड, लक्ष्मण काळे,आदी उपस्थित होते.

# आत्मचिंतनाने आंतर्बाह्य शुद्धी होते-ह.भ.प.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये

सोनपेठ (प्रतिनिधी):- सोनपेठ येथील नगरेश्वर मंदिरात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी ब्रह्मभूत गुरुवर्य वेदांताचार्य ह.भ.प.रंगनाथ गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त आर्यवैश्य समाजाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात सकाळी ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी गाथा भजन, सायंकाळी प्रवचन, हरिपाठ आणि रात्री हरिकीर्तन अशा कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. या सप्ताहात दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध व्याख्याते, कवी, लेखक, योगा-प्राणायाम प्रशिक्षक, कीर्तनकार ह.भ.प.प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये यांचे प्रवचन संपन्न झाले. ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायातील

येणें यमनियमाचेनि तळवटें। रिगे असनाचिये पाउलवाटें ।

येई प्राणायामाचेनि आडकंठें । वरौता गा ।।

या ओवीवर डॉ.जायभाये यांनी प्रवचनामध्ये वर्तमान परिस्थितीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चिंतन मांडले. आज जागतिक ध्यान दिवस असल्याकारणाने त्यांनी आपल्या चिंतनामध्ये यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधी या अष्टांग मार्गासह महात्मा गौतम बुद्धांनी सांगितल्याप्रमाणे सम्यक ज्ञान, सम्यक चारित्र्य, आणि सम्यक समाधी ही कशी श्रेष्ठ आहे याचे प्रतिपादन केले. याशिवाय आज तरुणांनी महत्त्वपूर्ण ग्रंथांचे अध्ययन करायला हवे. घराघरातून आपापल्या धर्म प्रार्थना होणे अपेक्षित आहे. आज घराघरात सामूहिक धर्मग्रंथांचे वाचन इत्यादी गोष्टी कालबाह्य झाल्यामुळे तरुण वर्गाला हायपरटेंशन, बीपी, शुगर इत्यादी भयंकर रोगांनी विळखा घातला आहे. मोबाईलच्या अति वापरामुळे समाज आणि तरुण वर्ग अस्वस्थ आहे. घराघरातला संवाद संपत आहे. निश्चितच ही येणाऱ्या काळासाठी आनंदाची गोष्ट नाही. त्यासाठी घराघरांमध्ये सामूहिक भोजन, भजन, प्रार्थना इत्यादिसह गाथा, ज्ञानेश्वरी आणि अन्य महापुरुष, संतांच्या ग्रंथांचे वाचन होणे आणि त्यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. आत्मचिंतनाने मानवाची अंतर्बाह्य शुद्धी होईल. असे झाल्यास पावलोपावली समाजात दिसणारे भेदाभेदाचे वातावरण मावळून जाईल. सगळीकडे देश आणि राज्य गुण्यागोविंदाने नांदेल. त्यासाठी आपण सर्वांनी संतांच्या विचारांची, ग्रंथांची कास धरून जात,धर्म,पंथ,लिंग आदी भेदाच्या पलीकडे जाऊन सामाजिक सलोखा, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सामाजिक सौहार्द इत्यादी गोष्टींचा विचार करावा. असे झाल्यास आपला देश आणि महाराष्ट्र कीर्तिमान होईल, असे सांगितले. या प्रवचनास सोनपेठ शहरातील जेष्ठ-श्रेष्ठ मंडळी, स्त्री-पुरुष, अबाल-वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी पसायदानाने प्रवाचनाची सांगता झाली.

# जिजाऊ मल्टीस्टेट एमपीआयडी प्रस्तावास तातडीने मान्यता द्यावी

**बीड (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीची पाळेमुळे खणताना अर्थिक गुन्हेगारी क्षेत्राकडे सुध्दा गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. जिल्ह्यातील हजारो ठेवीदारांना लुबाडणाऱ्या व्हाईट कॉलर अर्थिक गुंडाना कडक शिक्षा देवून धडा शिकवला पाहिजे. ठेवीदारांना न्याय देण्या ऐवजी कोट्यावधीचा गंडा घालणाऱ्या आरोपींना मदत करणारे आर्थिक गुन्हे शाखेचे तपास अधिकारी लाचखोर पीआय हरिभाऊ खाडे यांना सेवेतून बडतर्फ करावे अशी मागणी जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट अन्यायग्रस्त ठेवीदारांच्या वतीने मारुती तिपाले व शेख कुतुब यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात जिजाऊ माँसाहेब , ज्ञानराधा, साईराम ,राजस्थानी, मराठवाडा अर्बन यांच्यासह अनेक मल्टीस्टेट बँकांनी सामान्य जनतेचे करोडो रुपये लुटले. अन्याग्रस्त ठेवीदार हतबल असुन त्यांचे संसार आर्थिक संकटात आले. जिल्ह्यातील आर्थिक गुन्हेगारी बाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी उदासीनता दाखवली.आंदोलन, पाठपूरावा करून ही शासनाने दुर्लक्ष केले. परिस्थितीचा फायदा घेऊन पोलीस अधिकाऱ्यांनी चांगलेच हात धुवून घेतले.**

कर्तव्याचे भान न ठेवता ठेवीदारांना वाऱ्यावर सोडून आरोपींना मदत व फायदा होईल असाच तपास केला गेला. अनेक आरोपी फरार आहेत, तर ज्यांना पकडले त्यांची थातूरमातूर चौकशी करून कागदं काळे केले. आरोपींचा बीपी वाढेल अशी सबब पुढे करून जाणीवपूर्वक आरोपी कडून ठोस माहिती काढली नाही. पोलीस आणि आरोपी यांच्यामध्ये आर्थिक व्यवहार घडल्याने तपास कुचकामी ठरला. ठेवीदारांनी गुन्हा नोंद करून पावणे दोन वर्ष होत आहेत. अजूनही तपास पूर्णत्वाकडे नाही, एमपी आयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे आहे.ठेवीदारांना त्यांच्या घामाचा पैसा परत मिळणार की नाही याबद्दल साशंकता आहे. शासन दरबारी न्याय मिळवण्या साठी ठेवीदार धडपडत आहेत. न्याय विलंबना साठी पोलीस प्रशासन जबाबदार आहे. जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट ठेव घोटाळा प्रकणाचे तपास अधिकारी पीआय हरिभाऊ खाडे यांनी तपास काम करताना लाच घेतली. लाच लुचपत प्रतिबंधक विभागात त्यांचे विरोधात गुन्हा नोंक्र. ०१०७/१६/५/२०२४ रोजी गुन्हा रोजी नोंद केला गेला. खाडेवर पोलीस कस्टडी व न्यायालयीन कोठडीची कारवाई करण्यात आली. परंतु मुदतपूर्व चार्जशीट न्यायालयात दाखल करण्याची परवानगी वरिष्ठांनी नाकारली. यामुळे त्यांना जामीन मिळाला. रंगे हात पाच लाख रुपयांची लाच स्वीकारताना सक्षम अधिकारी पकडला. परंतु चार्जशीट दाखल करू दिले नाही. अंतिम क्षणापर्यंत ठेवीदार बांधवांनी पोलीस महासंचालकां पर्यंत चार्जशीट दाखल करण्याची विनंती केली. परंतु अद्याप चार्जशीट दाखल झाले नाही. लाचखोर लोकसेवका बाबत एवढी सदभावना कशामुळे...? कारण खाडे यांना मदत करणारा राजकीय हात त्यांच्या पाठीशी असल्याने त्यांचेवर कडक कारवाई झाली नाही. तपासाअंती उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती आढळल्याने दि. २१/११/२०२४ रोजी खाडे यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागात दुसरा गुन्हा नोंद झाला. खाडे यांच्या विरोधात दोन गंभीर गुन्हे असून ही खाडेवर कठोर कारवाई सोडाच ते आज मोकाट आहेत. आणि जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट प्रकरणाचा कुचकामी तपास धुळखात पडला. तपास अधिकारी खाडे यांना निलंबित करून जिजाऊ माँसाहेब, मल्टीस्टेट घोटाळ्यात सह आरोपी करून नव्याने तपास करून अद्यावत चार्जशीट न्यायालयात दाखल करावे अशी मागणी यापूर्वी अनेकदा गृह मंत्रालयापासून सर्व वरिष्ठांकडे केली आहे. देवेंद्रभाऊ सरकारने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन लाचखोर पीआय खाडे यांना तातडीने सेवेतून बडतर्फ करावे..... जिजाऊ माँसाहेब मल्टीस्टेट एमपीआयडी १९९९ अंतर्गत प्रस्ताव मान्यतेसाठी ११ जुलै २०२४ पासून गृह विभागाकडे आहे. हा प्रस्ताव अपूर्ण असूनयामध्ये सर्व आरोपींच्या मालमत्ता समाविष्ट करून प्रस्तावास मान्यता देण्यात यावी. व ठेवीदारांना पैसे परत देण्यासाठी ठोस कार्यवाही करण्यात यावी. अशी मागणी जिजाऊ माँसाहेब ठेवीदार डॉ.अरविंद काकडे,इंजि. सखाराम कळासे, लक्ष्मण हाटवटे, चंद्रकला ताई बांगर, विशाखा सूर्यवंशी, भाऊसाहेब परसे, सूर्यभान नवले, आदींनी केली आहे.

## स्व.सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या!

### शिरूर शहरात सर्व समाज बांधवांनी काढला कँडल मार्च तालुक्यातून उपस्थिती



शिरूर कासार (प्रतिनिधी):– जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील हत्याकांड प्रकरणी राज्य ढवळून निघाले असून संपूर्ण अधिवेशन या हत्याकांड भोवती फिरले आहे. यातील आरोपी काही अटक असून काही आरोपी फरार आहेत . दिवसाढवळ्या एका सरपंच लोकप्रतिनिधीचे अपहरण करून अमानुषपणे मारहाण करून ऋदय द्रावक घटना घडली असून सरपंचाला हालहाल करून खून करण्यात आला. याचे पडसाद उमटले आहेत असून शहरात या प्रकरणाच्या निषेधार्थ स्व. सरपंच संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या व यांच्या मास्टर माईड ला अटक करून खुनाचा गुन्हा नोंद करण्यात यावा अशी मागणी करत शहरातील जिजामाता चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यंत सर्व समाज बांधवांनी शुक्रवारी (दि.२०) काढला कँडल मार्च काढण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज चौकात स्व. देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी महिला पुरुष व मुले यांची उपस्थिती होती. यात हजारो बांधवांनी सहभाग घेतला.

## जितेंद्र सिरसाट धमकीची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी दखल घ्यावी

वडवणी (प्रतिनिधी):– बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाट यांना बीड जिल्हाधिकारी कार्यालयातील एका अधिकाऱ्याने बातमी का टाकली या कारणाने धमकी दिली. एवढेच नाही तर उचलून नेण्याची भाषा केली. सदर अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी आणि बीड जिल्ह्यातील पत्रकारांना संरक्षण देण्यात यावे अशी मागणी वडवणी येथील पत्रकारांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित दादा पवार यांच्याकडे केली आहे.

वडवणी येथील पत्रकारांनी वडवणीचे तहसीलदार कार्यालयात तहसीलदार विनायक दिवटे तसेच पोलीस ठाणे मार्फत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना मागणी केली आहे. त्यांनी निवेदनात म्हटले आहे की बीड येथील दैनिक वास्तवचे संपादक जितेंद्र सिरसाठ यांनी मागील पंचवीस वर्षाच्या



पत्रकारितेच्या माध्यमातून शेतकरी, शेतमजुरांना न्याय मिळवून देण्याची भूमिका बजावली आहे. अत्यंत मनमिळावू स्वभावाचे असलेले जितेंद्र सिरसाट यांनी कधीही चुकीच्या बातम्या छापलेल्या नाहीत. लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी कधी कधी अधिकाऱ्यांची नाराजी घेतलेली आहे. मात्र त्यांना या पद्धतीने धमकी देऊन आवाज दाबण्याचा प्रयत्न करणे हे चुकीचे आहे. वडवणी येथील पत्रकारांनी शनिवार दि २१ डिसेंबर रोजी निवेदन देऊन त्या ठिकाणी भावना व्यक्त केल्या. यावेळी पत्रकार अशोक निपटे यांनी बोलताना सांगितले की जितेंद्र सिरसाट हे अत्यंत सत्यवादी आणि न्यायप्रिय पत्रकार आहेत. त्यांच्यावर या पद्धतीने धमकी दिली जात असेल तर जिल्ह्यातील सर्वसामान्य पत्रकारांना पत्रकारिता करावी का नाही हा प्रश्न पडला आहे. यावेळी पत्रकार विनायक जाधव यांनी लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या पत्रकारांना धमकी देणाऱ्यावर कारवाईची मागणी केली. पत्रकार सतीश वाघमारे यांनी पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत कारवाई करून सदर अधिकाऱ्याला निलंबित करावे अशी मागणी केली. धमकी देणाऱ्या अधिकाऱ्याला निलंबित करण्याची मागणी यावेळी नव युवक पत्रकार प्रकाश उजगरे यांनी केली. पत्रकार लहू खारगे यांनी अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केली तर प्राध्यापक श्रीनिवास काकडे यांनी पत्रकाराला उचलून नेण्याची भाषा करणाऱ्या महिला अधिकाऱ्याचा जाहीर निषेध व्यक्त करून निलंबनाची मागणी केली.यावेळी पत्रकार आशोक निपटे पत्रकार रामेश्वर गोंडे, पत्रकार भैय्यासाहेब तांगडे, संपादक सतीश वाघमारे,पत्रकार विनायक जाधव, पत्रकार अशोक फपाळ, पत्रकार लहू खारगे, श्रीनिवास काकडे, अर्जुन मुंडे, जोतीराम कलेढोण, विनोद काकडे, प्रकाश उजगरे यांच्यासह भालेराव मित्र मंडळाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब साळवे व त्यांचे कार्यकर्ते यांचीही उपस्थिती होती.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील ट्रेनी शिक्षिकेची निवड नियमबाह्य

बीड (प्रतिनिधी):– प्रतिनिधी बीड तालुक्यातील च-हाटा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेंतर्गत ट्रेनी शिक्षिकेची निवड प्रक्रिया चुकीच्या पद्धतीने शासनाचे नियम डावलून केली आहे. संबंधित प्रकरणात गटशिक्षणाधिकारी यांनी लेखी आदेश देऊनही नियुक्ती न दिल्याने श्रीमती पिंगळे निकिता बाळु यांचे नातेवाईक आणि सहकारी यांनी काल दि.२० शुक्रवार रोजी जिल्हा परिषद शाळेच्या आवारात धरणे आंदोलन सुरू केले होते. शिक्षणाधिकारी यांनी संबंधित आंदोलन प्रकरणी गटशिक्षणाधिकारी बीड यांना लेखी आदेश देऊनही दुपारपर्यंत कोणीही



आंदोलनाची दखल घेतली नाही.आंदोलनकर्ते यांच्या विनंतीवरून सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन भगवान फुलारी ,शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषद बीड यांच्याशी फोनवरून संवाद साधल्यानंतर विस्तार अधिकारी उत्तमराव पवार यांनी आंदोलन स्थळी भेट देऊन संपूर्ण चौकशी करून मंगळवार पर्यंत अहवाल देण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.


मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियमबाह्य निवड केली असुन त्यांच्यावर कारवाई करून मला न्याय द्यावा :- पिडीत ट्रेनी शिक्षिका निकिता पिंगळे

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा च-हाटा येथे मुख्याध्यापिका परदेशी यांनी मला डावलुन नियमबाह्यपणे ईतर उमेदवाराची निवड केली.संबधित प्रकरणी गटशिक्षणाधिकारी खान यांना तक्रार केल्यानंतर त्यांनी चौकशी करून माझी शैक्षणिक पात्रता डीएड व एमएससीआयटी कागदपत्रे पाहुन माझी नियुक्ती करण्याचे आदेश देऊनही मुख्याध्यापिका परदेशी यांनी नियुक्ती केली नाही.शासनाच्या आदेशाप्रमाणे इन कॅमेरा निवड केली नाही तसेच उमेदवारांना एमएससीआयटी बंधनकारक असतानाही नियम डावलून ईतर उमेदवाराला नियुक्ती दिली. प्रशासनाने योग्य निर्णय घेऊन मला न्याय द्यावा अशी मागणी पिडीता निकिता पिंगळे यांनी सांगितले.

## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलचे ६ वे वार्षिक स्नेहसंमेलन

### मी होनार सुपरस्टार नृत्य कोरिओग्राफर साक्षी मेथे यांची विशेष उपस्थिती

परळी (प्रतिनिधी ) विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटी संचलित परळी येथील दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल व पोदार जम्बो किड्स चे ६ वे वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन मंगळवार दिनांक २४ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६:०० वाजता दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल च्या प्रणांगणामध्ये होत आहे.



या कार्यक्रमास विवेकानंद युथ वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा सौ.उषाताई किरण गित्ते, उपजिल्हाधिकारी मा.अरविंद लाटकर साहेब परळी वैजनाथ यांची उपस्थिती लाभणार आहे. स्टार प्रवाह चॅनल मधील 'मी होनार सुपरस्टार' नृत्य कोरिओग्राफर साक्षी मेथे यांची या कार्यक्रमासाठी 'विशेष आकर्षण' म्हणून उपस्थिती असणार आहे. या वार्षिक स्नेहसंमेलनाची थीम आहे 'उेपक्षीीळपस इेज़' म्हणजे विविध प्रकारचे पात्र असलेले मॅजिक बुक. देशाच्या प्रमुख राज्यातील संगीत ,नाटच आणि संस्कृतीची वैशिष्ट्ये विद्यार्थ्यांकडून या स्नेह संमेलनात प्रदर्शित करण्यात येणार आहेत. दिल्ली वर्ड पब्लिक स्कूल व पोदार जम्बो किड्स च्या ६ व्या वार्षिक स्नेहसंमेलना निमित्त ८०० हून अधिक विद्यार्थी- विद्यार्थिनींना आपल्या कला, नृत्य व गायन कौशल्याचे सादरीकरण करण्याची संधी मिळणार आहे. तरी वार्षिक स्नेह संमेलनासाठी सर्व विद्यार्थी आणि पालकांनी आवर्जून उपस्थित रहावे असे असे आवाहन दिल्ली वर्ड पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक डॉ. श्रीकांत पाटील व पोदार जम्बो किड्स च्या मुख्यध्यापिका स्नेहा गित्ते मॅडम यांनी केले आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुर्दाबाद विरोधात घोषणा देत वडवणी शहर दणाणले




वडवणी (प्रतिनिधी):– केंद्रीय गृहमंत्री अमित शहा लोकसभेत बोलताना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी असंविधानिक भाषा वापरली आहे. यामुळे समाज बांधवाच्या भावना दुखवल्या प्रकरणी शहा यांचा तात्काळ राजीनामा घेऊन त्यांना बाहेरचा रस्ता दाखविण्यात यावा या मागणीसाठी काल वडवणी तालुक्यातील आंबेडकरवाद्यांनी तहसिल कार्यालयावर तिव्र निदर्शने केली तर डॉ. आंबेडकर चौक ते तहसिल कार्यालया पर्यत पायी रॅली काढत मुर्दाबाद मुर्दाबाद केंद्रीय गृहमंत्री अमित शहा मुर्दाबादच्या घोषणा दिल्या आहेत. या घोषणेनी शहर दणाणले होते.तर या

### आंबेडकरवाद्यांचे तहसिल कार्यालयावर तिव्र निदर्शने

मागण्याचे लेखी निवेदन तहसिलदार यांना देण्यात आले आहे.

सदरील निषेध रॅलीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या विरोधात वेगवेगळ्या घोषणा देण्यात आल्या होत्या. यावेळ वडवणी शहरातील प्रमुख रस्ता दणाणला होता. या निषेध रॅलीत व निवेदनावर भाई महादेव उजगरे, बाबासाहेब वाघमारे, राजू वाघमारे, दिपक उजगरे, बाबासाहेब साळवे, महादेव आवाड, एस.के.उजगरे, नवनाथ डोंगरे, राम झोडगे, प्रकाश तांगडे, सुभाष पवार, दामु गायकवाड, अविनाश साळवे, अविनाश झोडगे, रावसाहेब राऊत, आप्पाराव मुजमुले, ऋषीकेश उजगरे, शाम उजगरे, विजय डोंगरे, विनोद डोंगरे, आप्पाराव मुजमुले, विश्वानाथ उजगरे, सुनिल डोंगरे, संतोष उजगरे, धम्मपाल डोंगरे, अमोल वाघमारे,भाऊ उजगरे, प्रज्वल उजगरे, समाधान उजगरे, पदमाकर उजगरे, भैय्यासाहेब काकडे, यशपाल वाघमारे, अँड. सचिन अवचार, आण्णासाहेब मस्के, युवराज उजगरे, दिलीप रोकडे ,निखील उजगरे, अँड.ऋषीकेश उजगरे, प्रशांत उजगरे,कृष्षा उजगरे, महादेव मुजमुले, दादा झोडगे,यश उजगरे, अमोल पौळ, प्रकाश उजगरे, विशाल गायकवाड, जय उजगरे, रुपेश उजगरे, किरण उजगरे, बंटी उजगरे, राज उजगरे, अतुल पाटोळे, अनिकेत उजगरे, सुरज उजगरे, राकेश उजगरे, बबन डोंगरे,रोषन उजगरे, तुषार उजगरे, नागुराव उजगरे ,यासह वडवणी शहरासह तालुक्यातील आंबेडकवादी समाजातील तरुण उपस्थिती होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक संजय रघुनाथ हांगे यांनी ओम ऑफसेट, क्रांतीनगर, तहसीलच्या मागे, डी.पी.रोड बीड, ता.जि.बीड (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक साप्ताहिक अक्षर वार्ता कार्यालय,क्रांतीनगर, तहसील कार्यालयाच्या मागे, डी.पी.रोड, बीड ता.जि.बीड पिन -४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले आहे. संपादक : संजय रघुनाथ हांगे,मो.९७६६२६८४१५ Email : aksharwartanews@gmail.com

The Newspaper Printed, Published and Owend by SANJAY RAGHUNATH HANGE and Printed at OM OFFSET, Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) and published at office Of DALY SAPTAHIK AKSHAR VARTA , Kranti Nagar, Behind Tahasil Office, D.P. Road, Tq, Dist. Beed 431122 (Maharashtra) Editor : SANJAY RAGHUNATH HANGE Mo : 9766268415